RNI No. MAHMAR/2016/72543

मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

संपादक : तुषार गायकवाड



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :१२ | रविवार,दि.२२ जुन ते शनिवार २८ जुन २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — मोकळ्या जागांचा श्वास...
पान ३ — डांबर प्लांटवर...
पान ४ — तहसील कार्यालयात...

## निळेमोरे तलाठी कार्यालयात खाजगी व्यक्तींचा बेकायदेशीर हस्तक्षेप; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

निळेमोरे येथील तलाठी कार्यालयात काही खाजगी व्यक्तींचा सततचा व बेकायदेशीर वावर होत असल्याच्या तक्रारी स्थानिक ग्रामस्थांनी केल्या असून, यामुळे शासकीय कार्यालयातील पारदर्शकता, गोपनीयता आणि कायदा-सुव्यवस्था यावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे.गंभीर आरोप: खोट्या गुन्ह्यांमध्ये खाजगी व्यक्तींचा सहभाग ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित खाजगी व्यक्तींनी तलाठ्याच्या मदतीने काही खोट्या गुन्ह्यांमध्ये साक्षीदार म्हणून आपली नावे दाखवून शासकीय यंत्रणेला दिशाभूल करणाऱ्या कृतीत सहभाग घेतला आहे. यामुळे स्थानिक पातळीवर प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे.

**शासकीय कार्यालयात खाजगी हस्तक्षेप – कायद्यानुसार दंडनीय!**

महाराष्ट्र जमाबंदी अधिनियम, तसेच महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कार्यालयांच्या सुरक्षितता धोरणानुसार, कोणत्याही खाजगी व्यक्तीस तलाठी कार्यालयासारख्या शासकीय ठिकाणी नियमित प्रवेश अथवा अधिकार न देता कामकाजात सहभागी होण्याची परवानगी नाही. तरीही संबंधित खाजगी लोकांचा वावर कायम आहे, हे गंभीर प्रशासकीय दुर्लक्षाचे द्योतक आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन, कारवाईची मागणी**स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे सादर केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की –'या खाजगी व्यक्तींनी प्रशासनावर अवैध व अनधिकृत दबाव टाकत, बनावट साक्षीदारीसारखे प्रकार केले आहेत. अशा लोकांना तात्काळ हद्दपार करण्यात यावे.'ते पुढे म्हणाले की, जर प्रशासनाने कारवाई केली नाही, तर स्थानिक जनता आंदोलनाच्या मार्गावर जाण्यास भाग पाडली जाईल.

**सत्ताधाऱ्यांना सवाल ग्रामस्थांनी विचारले आहे की** –'शासकीय कार्यालयात या खाजगी व्यक्तींना परवानगी कोणी दिली? प्रशासन त्यांच्यावर कारवाई का करत नाही? की यामागे काही आंतरिक 'समजूत' आहे?'कायदा आणि लोकशाहीची पुन्हा स्थापना गरजेची निळेमोरे तलाठी कार्यालयात सुरू असलेला हा प्रकार फक्त कार्यालयीन शिस्तभंग नसून, शासकीय प्रक्रियेत बेकायदेशीर हस्तक्षेपाचा प्रकार आहे. अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करून त्यांची तात्काळ हकालपट्टी केली जावी, अशी ग्रामस्थांची एकमुखी मागणी आहे.लोकशाही व्यवस्थेत कायदा सर्वोपरि असतो – त्याची पायमल्ली करणाऱ्यांना माफ करता येणार नाही.

## 'ठेका नाही, परवाना नाही, जबाबदारी नाही – महापालिकेचा कचरा कारभार उघड!'

वसई-विरार शहरात दररोज हजारो टन बांधकाम आणि पाडकाम कचरा निर्माण होत आहे. मात्र वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे 'सी अँड डी वेस्ट' (Construction & Demolition Waste) व्यवस्थापनासाठी कोणतीही ठोस यंत्रणा नाही. या संदर्भात महापालिकेकडे ना अधिकृत ठेका आहे, ना परवानाधारक यंत्रणा, ना जबाबदार अधिकारी नेमले गेलेत. केंद्र शासनाने २०१६ मध्ये स्पष्टपणे घालून दिलेल्या नियमांची सर्रास पायमल्ली करत महापालिका या संपूर्ण प्रक्रियेपासून कर्तव्यशून्य आणि निष्क्रियपणे पळ काढताना दिसते. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा आणि पर्यावरणाचा गंभीर खेळ सुरू आहे.केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने २९ मार्च २०१६ रोजी 'Construction and Demolition Waste Management Rule, २०१६' अधिसूचित केले. या नियमांनुसार प्रत्येक महानगरपालिकेला C&D कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, संकलन केंद्र उभारणे, अधिकृत ठेकेदार नेमणे, रिसायक्लिंग युनिट उभारणे, आणि Bulk Waste Generator कडून जबाबदारीची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. २० टनपेक्षा अधिक किंवा ३०० घनमीटरपेक्षा अधिक बांधकाम प्रकल्पांना त्यांच्या कडील कचरा अधिकृत पद्धतीने विल्हेवाट लावणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. या संपूर्ण व्यवस्थापनाची मुख्य जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेवर म्हणजेच महानगरपालिकेवर आहे. वसई-विरार महापालिकेने आजतागायत C&D waste बाबत

पान नं.३वर

## 'घनकचरा ठेकेदार, माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी आणि आरोग्य निरीक्षकांची लूटसाखळी — आयुक्तांचे गप्प समर्थन?'




एकाच वेळी दोन-दोन महापालिकेत कार्यरत दाखवलेले बनावट मजूर, 'बायोमेट्रिक हजेरी' टाळून उकळलेली बनावट बिले, महापालिकेच्या कंत्राटी व्यवस्थेचा खुला खेळ आणि माहिती अधिकारात केवळ 01% माहिती देऊन जनतेची फसवणूक करणारे अधिकारी – हे सर्व एकत्र येऊन वसई-विरार महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या भयंकर भ्रष्टाचाराचे दर्शन घडवतात!वसई-विरार महापालिकेत घनकचरा व्यवस्थापनाच्या नावाखाली कोट्यवधींचा अपहार, बनावट मजूरांची नेमणूक, सरकारी पगारांची लूट आणि माहिती अधिकार कायद्याचे उघड उल्लंघन सुरू असून, प्रशासन त्याकडे पाहून गप्प आहे. विशेष म्हणजे, या सर्व गैरव्यवहारांच्या पार्श्वभूमीवर आयुक्त कार्यालयाचे संदिग्ध मौन अधिकच धक्कादायक आहे.महापालिकेच्या कंत्राटी मजुरांच्या यादीत एकाच व्यक्तीचे नाव दोन-दोन वेगवेगळ्या महापालिकांमध्ये दाखवून, प्रत्यक्ष अनुपस्थित असलेल्या व्यक्तींना कामावर असल्याचे दाखवत, लाखो रुपयांचे पगार उकळले जात आहेत. बायोमेट्रिक हजेरी प्रणाली मुद्दाम बंद ठेवली जाते, आणि हजेरी रजिस्टरवर बनावट सही करून बिलं मंजूर केली जातात. याचा सर्व खर्च करदात्यांच्या खिशातून होतो असून, त्याच्या आड आयुक्त कार्यालयाचं वर्तन संशयाच्या भोवऱ्यात आलं आहे.कामगार कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असून, कुशल कामगार असतानाही अकुशल दराने वेतन दिले जाते. बनावट नावाने मजूर दाखवून, नातेवाईक, घरगुती व्यक्ती आणि इतर ठिकाणचे कर्मचारी महापालिकेच्या यंत्रणेत दाखवले जात आहेत. हे सर्व प्रकार केवळ नियमभंग नाहीत, तर थेट कायद्याचा आणि लोकशाही मूल्यांचा अपमान आहे.या गंभीर घोटाळ्याची माहिती मिळवण्यासाठी दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी माहिती अधिकारांतर्गत अर्ज करण्यात आला होता. सातत्याने पाठपुरावा करूनही आठ वर्षे सात महिन्यांची माहिती देण्याऐवजी केवळ दोन-तीन महिन्यांची, तीही अपूर्ण आणि प्रमाणित नसलेली माहिती ई-मेल व व्हॉट्सॲपवर पाठवण्यात आली. ही कृती माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींचा सरळ उल्लंघन असून, नागरिकांच्या निरीक्षण व पडताळणीच्या हक्काची थेट पायमल्ली आहे.या अपूर्ण माहितीकडे गांभीर्याने बघण्याऐवजी, दि. १६ जानेवारी २०२५ रोजी दाखल करण्यात आलेल्या प्रथम अपीलवर तीन महिने उलटल्यानंतरही कोणतीही सुनावणी झाली नाही. त्यानंतर दि. २८ एप्रिल २०२५ रोजी आयुक्तांना तक्रार अर्ज

पान नं.२वर

# संपादकीय...!

## मोकळ्या जागांचा श्वास...

'विकास' आणि 'सार्वजनिक हित' यामधील समतोल राखणारा महत्त्वाचा आदेशआरक्षित जागांवर उभारण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये ३५ टक्के जागा उद्यान, मैदाने व सार्वजनिक उपयोगासाठी मोकळी ठेवण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश हे केवळ एका प्रकरणाचे निकालपत्र नसून, नगर नियोजनातील मूलभूत तत्त्वांचा पुनःशोध आहे.

न्या. अमित बोरकर व न्या. सोमसेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठाने दिलेला हा निकाल केवळ मुंबईपुरता मर्यादित नसून, राज्यभरातील शहरी विकासप्रकल्पांसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे. आरक्षित जागांवर झालेली अतिक्रमणे आणि त्या जागांवर पुनर्विकासाच्या नावाखाली उभारल्या जाणाऱ्या गगनचुंबी इमारती, यामुळे सार्वजनिक आरक्षणांचा बळकावलेला परिसर ज्या पद्धतीने 'गायब' केला जातो, त्या विरोधात न्यायालयाचा हा आदेश महत्त्वपूर्ण ठरतो.

आरोग्य, पर्यावरण आणि न्यायसंगत विकासाचा विचार

सार्वजनिक जागा म्हणजे केवळ जागेचा तुकडा नव्हे; ती शहराच्या फुफ्फुसासारखी असते. नागरिकांना आरोग्यदायी वातावरण, मुलांना खेळण्यासाठी मोकळा श्वास आणि समाजजीवनाला सांघिक वाट मिळावी म्हणून आरक्षणे ठेवली जातात. मात्र, विकासाच्या नावाखाली अशा जागांचा खासगी मालकीच्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये समावेश करून टक्केवारीचा खेळ केला जातो, याची न्यायालयीन दखल घेण्यात आली आहे.

'झोपडपट्टीवासीयांचा पुनर्विकास' हे एक सामाजिक उत्तरदायित्वाचे काम असले, तरी सार्वजनिक जागांची गळचेपी करून ते साध्य करणे स्वतःच अन्यायकारक ठरते.

प्रशासनाची जबाबदारी आणि न्यायालयाची दिशा

खंडपीठाने सार्वजनिक वापरासाठी ३५ टक्के सलग जमीन राखून ठेवण्यासोबत, त्या भागात खरेच मैदान व उद्यान उभे राहते की नाही, यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखरेख ठेवावी, तिमाही अहवाल द्यावा आणि नियमभंग केल्यास प्रकल्प नाकारावा, असे स्पष्ट बजावले. सामाजिक दृष्टिकोन आणि पर्यावरणविषयक संवेदनशीलता यांचे समतोल धोरण न्यायालयाने दाखवले आहे.

सरकार आणि प्राधिकरणांसमोरील आव्हाने

हा आदेश जरी पर्यावरणपूरक असला, तरी वास्तवात त्याची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी येणार आहेत. मुंबईसारख्या शहरांमध्ये जागेची टंचाई आहेच. त्यात ३५ टक्के जागा सार्वजनिक वापरासाठी राखून ठेवणे ही डेव्हलपर्ससाठी आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक बाब ठरू शकते. त्यामुळे टीडीआर **(TDR)**, प्रोत्साहन धोरणे, किंवा कायद्यात बदल करून योग्य तो समतोल राखावा लागेल.

'मोकळ्या जागा' हा सुद्धा 'विकास' आहे

नगर नियोजन ही फक्त बांधकाम परवानग्या, जागेचे आरक्षण आणि प्रकल्प मंजुरीपुरती प्रक्रिया नाही. तिच्या मुळाशी माणसांचे जीवनमान, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि पर्यावरणीय समतोल आहे. न्यायालयाच्या या आदेशाने नेमकी हीच गोष्ट अधोरेखित केली आहे.

'विकास की मोकळा श्वास?' असा वाद निर्माण करणाऱ्यांना हे लक्षात घ्यावे लागेल की, विकास म्हणजे फक्त सिमेंटचे जंगल नव्हे; तर मोकळ्या जागांचे शाश्वत नियोजनही त्याच्याइतकंच महत्त्वाचं आहे.हा न्यायालयीन आदेश म्हणजे फक्त कायद्याचा निकाल नसून, नागरी व्यवस्थेला साद दिलेली जाणीव आहे. शहरी जीवनाचा श्वास फक्त उंच इमारतींमध्ये अडकवू नये, हे वेळोवेळी सांगावं लागणं ही दुर्दैवी गोष्ट असली, तरी त्याच वेळी न्यायालय अशा पद्धतीने हस्तक्षेप करतो, ही लोकशाहीची आणि लोकहिताची आशादायक बाजूही आहे.

## 'घनकचरा ठेकेदार, माहिती अधिकारी... पान नं १

सादर करण्यात आला. मात्र, या तक्रारीवरही कोणतीही कारवाई झालेली नाही. इतक्या स्पष्ट पुराव्यांनंतरही जर आयुक्त कारवाईस नकार देत असतील, तर त्यांची भूमिका संशयास्पद वाटल्यास नवल नाही.या प्रकरणात माहिती अधिकार जबाबदारीत नियुक्त असलेल्या श्री. केदारे, श्री. जितेंद्र नाईक, श्री. धुमाळ, श्री. गुंजाळकर आणि प्रथम अपिलीय अधिकारी नानासाहेब कामठे यांनी फक्त 1% अपूर्ण माहिती पुरवून ठेकेदारांना पाठीशी घातले आहे. त्यांनी माहिती अधिकाराच्या तरतुदींनाच बगल देत, जनतेच्या अधिकारांवर गदा आणली आहे.घनकचरा व्यवस्थापनातील भ्रष्टाचाराबरोबरच, वसई-विरार महापालिकेच्या हद्दीतील सर्व ९ विभागांतील २० झोनमधील औद्योगिक आणि राहिवासी भागांमध्ये, Solid Waste Management ठेकेदार आणि आरोग्य निरीक्षकांच्या संगनमताने सुरू असलेल्या आणखी एका गंभीर आर्थिक घोटाळ्याचं चित्र उघडकीस आलं आहे.सातिवली, पेल्हार, वाळीव, वसई गाव, वसई पश्चिम, विरार, नालासोपारा आदी भागांतील उद्योगांमधून निर्माण होणारा C&D Waste (बांधकाम व पाडकामजन्य कचरा) आणि Industrial Hazardous Waste — जो उद्योगधारकांनी स्वतःच्या खर्चाने आणि कायद्याने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे — तोच कचरा महापालिकेच्या डंपर, कंपॅक्टर व ट्रॅक्टरसारख्या सरकारी वाहनांद्वारे उचलला जात आहे.हे संपूर्ण कार्य बेकायदेशीर असून, महापालिकेकडे यासाठी कोणतीही अधिकृत निविदा, मंजुरी, परवानाधारक ठेकेदार अस्तित्वात नाहीत. आरोग्य निरीक्षक व ठेकेदार हे उद्योगधारकांकडून खाजगी मोबदला घेऊन, महापालिकेच्या वाहनांचा, डिझेलचा आणि कर्मचाऱ्यांचा वापर खासगी कामासाठी करत आहेत. यामुळे सार्वजनिक निधीचा अपहार, शासकीय संपत्तीचा दुरुपयोग आणि पर्यावरणीय कायद्यांचं उल्लंघन होत आहे.Solid Waste Management साठी नेमलेले ठेकेदार त्यांचं मूळ कार्य सोडून, हा बेकायदेशीर कचरा उचलण्याचा 'व्यवसाय' करत आहेत. यामुळे रहिवासी भागांतील नियमित कचरा संकलन रखडत असून, अनेक झोनमध्ये सार्वजनिक आरोग्य धोक्यात आलं आहे. हे सर्व काम महापालिकेच्या कोणत्याही अधिकृत आदेशाविना सुरू आहे.यासंबंधीचे ठोस पुरावे — फोटो, व्हिडिओ, वाहन क्रमांक, नागरिकांच्या तक्रारी — तक्रारदारांकडे उपलब्ध असून, यावर त्वरित कारवाईची गरज आहे.या पार्श्वभूमीवर, पुढील तातडीच्या उपाययोजना होणे आवश्यक आहे :स्वतंत्र आर्थिक आणि प्रशासकीय चौकशी समितीची तातडीने स्थापना करून दोषींवर जबाबदारी निश्चित करावी.संबंधित आरोग्य निरीक्षक, मुकादम आणि ठेकेदारांवर भ्रष्ट व पर्यावरणीय कायद्यांतर्गत फौजदारी गुन्हा नोंदवावा.महापालिकेच्या वाहनांचा व डिझेलचा वापर खाजगी उपयोगासाठी केल्याबद्दल दोषींकडून संपूर्ण नुकसान भरपाई वसूल करण्यात यावी.सर्व विभागांतील ठेवा औद्योगिक कचऱ्याचे संकलन थांबवावे, जोपर्यंत अधिकृत कायदेशीर यंत्रणा स्थापन होत नाही.संबंधित बाबींवर दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर विभागीय शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.हे प्रकरण केवळ एका विभागाचा प्रश्न नाही, तर संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेतील भ्रष्ट साखळीचं ठळक प्रतिबिंब आहे. यावर तात्काळ व कठोर कारवाई झाली नाही, तर माहिती अधिकार आणि लोकशाही दोन्ही अपायकारक दिशेने जाणार हे स्पष्ट आहे.

संशयित ठेकेदारांची झोनवार यादीः

झोन क्र. ठेकेदाराचे नाव १ अनंत इंटरप्रायझेस २ उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर ३ साई गणेश इंटरप्रायझेस ४ रेनबो इंटरप्रायझेस ५ अनंत इंटरप्रायझेस ६ दिनेश संखे ७ रिलायबल एजन्सी ८ हेना इंटरप्रायझेस ९ अनंत इंटरप्रायझेस १० साई गणेश इंटरप्रायझेस ११ हेना इंटरप्रायझेस १२ उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर १३ उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर १४ रिलायबल एजन्सी १५ शिवम इंटरप्रायझेस १६ साई गणेश इंटरप्रायझेस १७ रिलायबल एजन्सी १८ मंदीप इंटरप्रायझेस १९ आर. बी. इन्फ्रा २० दिनेश संखे या प्रकरणात माहिती अधिकार अधिकारी श्री. केदारे, श्री. जितेंद्र नाईक, श्री. धुमाळ, श्री. गुंजाळकर व प्रथम अपिलीय अधिकारी नानासाहेब कामठे यांनी ठेकेदारांच्या बाजूने अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पुरवून कायद्याची पायमल्ली केली आहे. त्यांना आयुक्तांमार्फत संरक्षण मिळत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

## 'ठेका नाही, परवाना नाही,... पान नं.१

कोणतीही निविदा काढलेली नाही, कोणत्याही खासगी यंत्रणेला ठेका दिलेला नाही, आणि कोणत्याही विभागाला याबाबत जबाबदारी सोपवलेली नाही. महापालिकेच्या सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट विभागाकडे याबाबत कोणतीही स्पष्ट कार्ययोजना नाही. नगर अभियंता कार्यालयानेही निविदा प्रक्रियेची सुरुवात केलेली नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वसई-विरार शहरातून निर्माण होणाऱ्या C&D कचऱ्याची कोणतीही नियमित नोंद उपलब्ध नाही. ही स्थिती म्हणजे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा आणि जबाबदारी टाळण्याचा स्पष्ट नमुना आहे.

**Environment (Protection) Act, 1986, Solid Waste Management Rules, 2016,** तसेच महानगरपालिका अधिनियमांनुसार, **C&D** कचऱ्याची अनधिकृत विल्हेवाट, नद्या-नाल्यांमध्ये फेक, सार्वजनिक जागांवर ढिगारे टाकणे हे गंभीर स्वरूपाचे पर्यावरणविषयक गुन्हे आहेत. दोषींवर ५,००० ते १,००,००० पर्यंत दंड, तसेच काही प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्याची तरतूद आहे. मात्र वसई-विरारमध्ये आजपर्यंत एकाही अशा प्रकारच्या गुन्ह्याची नोंद झालेली नाही. ही बाब महापालिकेच्या निष्क्रीयतेपेक्षा अधिक म्हणजे संभाव्य संगनमताची शंका निर्माण करते.बांधकाम व्यावसायिकांकडून निर्माण होणारा C&D कचरा अनेकदा खासगी ट्रॅक्टर चालकांकडून गोळा केला जातो आणि नद्यांच्या किनाऱ्यावर, डोंगरांमध्ये, तलावांच्या लगत किंवा सार्वजनिक मालकीच्या जमिनींवर अनधिकृतपणे फेकला जातो. या कचऱ्याच्या वाहतुकीसाठी कोणतीही अधिकृत परवानगी, पर्यावरण मंजुरी, किंवा रिसायक्लिंग व्यवस्था न घेता हा प्रकार वर्षानुवर्षे सुरू आहे. महापालिकेने यावर डोळेझाक केली असून, आजवर कोणतीही कारवाई झालेली नाही.वास्तविकता अशी आहे की, C&D waste व्यवस्थापनासाठी ना ठेका आहे, ना निविदा, ना रिसायक्लिंग यंत्रणा, ना परवाने, ना जबाबदार अधिकारी – आणि ना मागील कारवाईची कोणतीही नोंद. या साऱ्या प्रकारावरून वसई-विरार महापालिकेने कायद्याची पूर्णपणे पायमल्ली केली असून, पर्यावरण आणि सार्वजनिक हिताला दुय्यम स्थान दिले आहे.शहरात सुरू असलेल्या प्रचंड प्रमाणातील बांधकामामुळे दरवर्षी लाखो टन कचरा निर्माण होत आहे. हा कचरा नेमका जातो कुठे, हे आजही अनुत्तरित आहे. या कचऱ्याच्या बेकायदेशीर विल्हेवाटीमागे महापालिकेचे अप्रत्यक्ष समर्थन आहे का, असा संशय आता निर्माण होतोय. महापालिका, MPCB आणि प्रशासन यांच्याविरुद्ध तातडीने चौकशी आणि कारवाई आवश्यक झाली आहे.

राज्य शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वसई-विरार महापालिकेकडून **C&D waste** व्यवस्थापनासंदर्भात स्पष्टीकरण मागवावे, जबाबदारी निश्चित करावी, आणि संबंधित अधिकारी व दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी जनतेची आणि पर्यावरणप्रेमींची एकमुखी मागणी आहे.

# वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना करा – आमदार विलास तरे यांचा प्रशासनाला सज्जड दम

## मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील वाहतूक समस्यांवर बोईसर येथे उच्चस्तरीय बैठक



बोईसर - प्रतिनिधी- मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर गेल्या काही दिवसांपासून भीषण वाहतूक कोंडी निर्माण होत असून, या गंभीर समस्येवर तातडीने ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, असे स्पष्ट निर्देश बोईसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास तरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.शनिवारी ढेकाळे येथील महामार्ग वाहतूक पोलिस कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी ही भूमिका मांडली. बैठकीत प्रशासन, पोलीस, महामार्ग प्राधिकरण व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध अधिकारीवर्गाची उपस्थिती होती.

**औद्योगिक, वैद्यकीय आणि व्यापारी हालचालींवर परिणाम**

आ. तरे यांनी नमूद केले की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ केवळ दोन राज्यांना जोडणारा दुवा नाही, तर तो पालघर जिल्ह्याच्या औद्योगिक, वैद्यकीय, व्यापारी आणि शैक्षणिक जीवनवाहिनीसारखा आहे. विशेषतः बोईसर – तारापूर एमआयडीसी, वसई-विरार महानगर, विविध बंदर, आयात-निर्यात कंपन्या आणि रुग्णसेवा यासाठी या महामार्गावर होणाऱ्या वाहतूक अडथळ्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थाच विस्कळीत झाली आहे.

**वाहतूक कोंडीमुळे गंभीर परिणाम**

रुग्णवाहिका अडकल्यामुळे गंभीर रुग्णांच्या प्राणाला धोका

एमआयडीसीमधील मालवाहतूक रखडल्याने निर्यात ठप्पनागरिक वेळेत कामावर पोहोचू न शकल्याने अडचणीअपूर्ण रस्ते कामे, मोठे खड्डे आणि अर्धवट योजना – अपघातांना आमंत्रणसातवली उड्डाणपुलाजवळ १४ जणांचा अपघातात मृत्यू – मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**बैठकीतील ठळक मागण्या आणि आश्वासने**

ठेकेदाराने १५ दिवसांत सातवली सर्व्हिस रोड पूर्ण करण्याचे दिले आश्वासन

४०० स्ट्रीटलाईट पोल तातडीने बसवावेत

दुभाजकाची उंची वाढवण्याचे नियोजन

३ शिफ्टमध्ये किमान ६० ट्राफिक वॉर्डनची मागणी

सातवली पुलाजवळील मृत्यू प्रकरणी मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी

पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र फूटओव्हर ब्रिज

महामार्गावरील खड्डे बुजवण्याचे लेखी आश्वासन

**बैठकीस उपस्थित प्रमुख पदाधिकारी आ. विलास तरे**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक सुहास चिटणीस, अभियंते आर. राय, संतोष सैनिस महामार्ग वाहतूक पोलीस उप अधीक्षक संतोष खानविलकरउप प्रादेशिक परिवहन अधिकारी औदुंबर गवईपोलीस निरीक्षक महेश शेटे, संतोष शेंडगे, रवींद्र बयेस मनपा अभियंते संजय कुलकर्णी, विजय चव्हाण, अमित शिंदे

ऑल इंडिया वाहन चालक संघटना: हरभजनसिंह नानादे, टीमा असोसिएशनचे पदाधिकारी

**आमदार तरे यांचा इशारा** – 'नागरिकांच्या संयमाचा अंत झाला आहे!'

'वारंवार निवेदने, मागण्या करूनही उपाययोजना होत नाहीत. स्थानिक नागरिकांचा संयम आता संपत चालला आहे. प्रशासनाने याला गांभीर्याने न घेतल्यास, पुढील आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील,' असा इशारा आ. तरे यांनी दिला.मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक समस्या ही फक्त एक तांत्रिक त्रुटी नाही, तर ती जनतेच्या मूलभूत हक्कांवर घाला आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना याचा ताण सहन करावा लागत आहे. त्यामुळे यावेळी केवळ चर्चा नव्हे, तर कडक अंमलबजावणी आणि जबाबदारी निश्चितीची आवश्यकता आहे.

# डाबर प्लांटवर कारवाईसाठी आगरी-कोळी सेनेचे तीव्र आंदोलन

वसई | वार्ताहर-वसई तालुक्यातील पूर्ववसई भागात मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत सुरु असलेल्या २८ अनधिकृत आरएमसी युनिट्स आणि डाबर प्लांट्स यांच्यावर ठोस कारवाई न झाल्याने आगरी-कोळी सेनेने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

या संदर्भात सेनेने वसई तहसीलदार कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. याप्रकरणी प्रशासनाने वेळोवेळी निवेदने मिळूनही योग्य ती कारवाई केली नसल्याने, नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण व कायदाचक्र यास गंभीर धोका निर्माण झाला आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

नियमानुसार मंजुरी नाही, तरीही सुरू आहे अवैध उत्पादन

या अनधिकृत युनिट्समुळे परिसरात ध्वनीप्रदूषण, जलप्रदूषण आणि धुळीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. ही युनिट्स ना ग्रामपंचायतीची ना पर्यावरण विभागाची ना उद्योग विभागाची अधिकृत मंजुरी घेऊन कार्यरत असूनही स्थानिक प्रशासनाने कारवाई करण्यास टाळाटाळ केली, असा आरोप सेनेच्या जिल्हाध्यक्षांनी केला आहे.

संयमाचा अंत झाल्यास तीव्र आंदोलन

आगरी-कोळी सेनेचे वसई महामंडळ प्रमुख राजेंद्र नाईक, संपर्कप्रमुख श्रीराम म्हात्रे आदी पदाधिकाऱ्यांनी 'आम्ही यापुढे शांत राहणार नाही. जर तात्काळ कारवाई झाली नाही,

तर वसई तहसीलदार कार्यालयासमोर आमरण उपोषण करू,' असा इशारा दिला आहे.

**प्रशासनाच्या दुर्लक्षावर टीका**

तहसीलदार कार्यालय, महसूल व प्रदूषण नियंत्रण मंडळ, पोलीस यंत्रणा – या सर्वांकडून ठोस पावले न उचलणे म्हणजे अनधिकृत व्यावसायिकांचे मूक समर्थन असल्याचा आरोप करण्यात आला. आरटीआय अंतर्गत माहिती मागवूनही उत्तर मिळालेले नाही,

असा दावा करण्यात आला.

**ही बाब फक्त स्थानिक प्रश्न नसून पर्यावरण व जनस्वास्थ्याचा गंभीर मुद्दा असून, यावर तत्काळ उपाययोजना, अनधिकृत प्लांट्सवर बंदी, आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.**






# गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी झुंज – 'शंभूराजे मिशन'कडून मुख्यमंत्री यांना साकडे!

माळवाडी (ता. पलूस, जि. सांगली) येथील ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पाणीपट्टी व घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामागे असलेली सामाजिक समजूत दृष्टीकोनातून सकारात्मक असली, तरी अशा सवलती देताना शिक्षणासारख्या मूलभूत हक्काशी अटी जोडल्याचा गंभीर मुद्दा आता समोर येतो आहे.

या पार्श्वभूमीवर 'शंभूराजे मिशन'चे अध्यक्ष विनायक खर्डे यांनी थेट मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन पाठवले असून, शिक्षणाच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याची मागणी केली आहे.

विनायक खर्डे यांनी पत्राद्वारे विचारले आहे की, 'घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्यासाठी मुलांच्या शैक्षणिक प्रवेशावर अट लादणे म्हणजे गरिबीची थट्टाच आहे का?' त्यांनी भावनिक शब्दांत गरिब विद्यार्थ्यांच्या मनस्थितीवर प्रकाश टाकत, सध्याच्या शिक्षण पद्धतीच्या उणीवा उघड केल्या आहेत.शैक्षणिक सुधारणा मागण्यांचे ठळक मुद्दे:महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये CBSE पॅटर्न लागू करावा.विद्यार्थ्यांना फक्त शैक्षणिक वस्तू नव्हे तर गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे.जर्मनी, फ्रान्ससारख्या देशांत फी आणि दर्जेदार शिक्षण मिळते, तसेच धोरण महाराष्ट्रात आणावे.

गरीब आणि सामान्य विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि केंद्रीय सेवांमध्ये संधी मिळावी, यासाठी अभ्यासक्रमात सुधारणा करावी.

खर्डे यांनी स्पष्ट केले की, 'सरकारी नेत्यांची मुले खासगी शाळांमध्ये उच्च शिक्षण घेतात, पण सामान्यांची मुले जुनाट पद्धतीत अडकतात. हे दुजाभावाचे धोरण थांबले पाहिजे.'

त्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शिक्षणाच्या पायाभूत पातळीवर आवश्यक बदल होऊन, मराठी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेच्या युगात खंबीर पाया तयार होईल.'

सदर निवेदनाने शासनासमोर केवळ एका गावातील समस्या नव्हे, तर राज्यातील गरीब विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित व्यापक प्रश्न अधोरेखित केले आहेत. आता मुख्यमंत्री कार्यालय या मागणीची गांभीर्याने दखल घेत शैक्षणिक धोरणात मूलगामी बदल घडवणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# तहसील कार्यालयात कार्यकर्त्यांचा विजय!

## वसईत नायब तहसीलदारांची केबिन आणि एसी हटवले

वसई | वार्ताहर- वसई तहसील कार्यालयात नायब तहसीलदार आणि निवासी तहसीलदारांसाठी अनधिकृतपणे उभारलेली केबिन आणि वातानुकूलित यंत्रणा **(AC)** अखेर हटवण्यात आली आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या जीआरनुसार ही कारवाई करण्यात आली असून, या मागे सामाजिक कार्यकर्त्यांचा ठाम पाठपुरावा कारणीभूत ठरला आहे.या लढ्यात सुनील डिसिल्वा, निलेश वर्तक, प्रशांत धोंडे आणि शरद अण्णा तिगोटे या सामाजिक कार्यकर्त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



**शासन निणऱ्याचा सर्रास भंग?**

राज्य शासनाने २०१५ पासूनच विविध विभागांना दिलेल्या सूचनांनुसार, शासकीय कार्यालयांमध्ये अनावश्यक केबिन व एसी वापरास प्रतिबंध घालण्यात आला आहे. मात्र, वसई तहसील कार्यालयात याचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यावर या कार्यकर्त्यांनी वारंवार तक्रारी, पत्रव्यवहार आणि अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून ही बाब हायलाईट केली.

**कार्यकर्त्यांच्या आवाजाला यश**

सामाजिक कार्यकर्त्यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश मिळालं असून प्रशासनाने अखेर केबिन व एसी हटवले. ही बाब जनतेच्या हक्कांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी एक विजय ठरली आहे.या कारवाईमुळे वसई तहसील कार्यालयात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे. शासन निणऱ्य, पारदर्शक प्रशासन, आणि जनतेच्या हक्कांचं संरक्षण यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी उभारलेला आवाज आता फलद्रूप झाला आहे.

# वसई- भाबोळा रस्त्यावर पावसात रातोरात डांबरीकरण!

## करदात्यांच्या पैशांचा प्रशासनाकडून उधळपट्टी, नागरिकांमध्ये संतापाची लाट



वसई,(प्रतिनिधी):वसई-विरार महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या वसई-भाबोळा मार्गावर प्रशासनाने पावसात रातोरात डांबरीकरण करून एक नवा वाद ओढवून घेतला आहे. या डांबरीकरणाचे कोणतेही नियोजन न करता केवळ वरिष्ठ पाहुण्यांच्या स्वागतासाठी हा 'तातडीचा विकास' केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सर डी. एम. पटेल रुग्णालयाच्या नव्या इमारतीचे उद्घाटन होणार असल्याने, तातडीने आणि रातोरात डांबरीकरण सुरू करण्यात आले. पण हे काम रात्रभर चालवूनही पूर्णत्वास गेले नसल्याने आणि त्यात पावसामुळे चिखल व खड्डे निर्माण झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेक वाहनचालकांचे वाहन बिघडले, तर काही नागरिक गंभीर जखमी झाले आहेत.महापालिकेने या रस्त्यावर कधी डांबरीकरण, कधी पेवर ब्लॉक अशी दिशाहीन आणि धोकादायक कामे करून करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी केल्याचा आरोप केला जात आहे. नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांतून वाट शोधत चालणे ही नित्याची गोष्ट झाली आहे.शहरातील सामाजिक कार्यकर्ते व पालिकेचे माजी सभागृह नेता प्रकाश सातम यांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला असून, 'हे निव्वळ निकृष्ट विकासकाम आहे. पावसात डांबरीकरण करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई झाली पाहिजे,' अशी मागणी केली आहे.

# माहिती अधिकार अपिलांवरील सुनावणी आता सर्वसामान्यांसाठी खुली!

## पारदर्शकता आणि लोकशाही प्रक्रियेत मोठा टप्पा; कोकण खंडपीठाचा ऐतिहासिक निर्णय

मुंबई | प्रतिनिधी | :माहिती अधिकार अधिनियमानुसार दाखल करण्यात आलेल्या अपिलांवरील सुनावणी आता सर्वसामान्य नागरिकांसाठी खुली करण्यात येणार आहे. कोकण खंडपीठाने हा ऐतिहासिक निणऱ्य दिला असून, माहिती आयोगाच्या खंडपीठांमध्ये आता कोणीही सुनावणीला हजर राहू शकतो.राज्य माहिती आयोगाच्या ६ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत या निणऱ्याचा पाया घालण्यात आला होता. त्यानंतर १६ जून २०२५ रोजी कोकण खंडपीठाने पारदर्शकता व लोकशाही मूल्यांनुसार अंतिम निणऱ्य जाहीर केला.

**महत्त्वाचे मुद्दे:** आता प्रथम व द्वितीय अपिलांची सुनावणी खुल्या सभागृहात होणार.

नागरिक, माध्यम प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते या सुनावणीत उपस्थित राहू शकतात.

**RTI** (माहितीचा अधिकार) अधिनियम २००५ च्या पारदर्शकतेच्या हेतूनुसार हा निणऱ्य महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

असे असतील नियम:

१. खुल्या सुनावणीत उपस्थित राहण्यासाठी कोणतेही अटी-शर्ती नाहीत. उपस्थित असणाऱ्यांनी शांतता राखणे गरजेचे आहे.

२. इतर नागरिक फक्त निरीक्षक म्हणून उपस्थित राहू शकतील. ते सुनावणीत हस्तक्षेप करू शकणार नाहीत.

३. न्यायालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक असेल. कोणत्याही प्रकारच्या गोंधळास अनुमती नसेल.

**काय म्हणाले अधिकारी?**

राज्य माहिती आयुक्तांनी सांगितले की, 'ही बाब अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ही पद्धत संपूर्ण राज्यात लागू करावी यासाठी पुढील टप्प्यावर विचार सुरू आहे.' कोकण खंडपीठाचा निणऱ्य माहिती अधिकाराच्या लढ्यातील एक ऐतिहासिक पाऊल असून, नागरिकांना शासन प्रक्रियेत अधिक सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.






## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in